नि.दि.दा. क्र. २२/२०२१
सुनिल वि. सखाराम
CNR No.MHWS080002492021

## निशाणी क्र. १८ खाली आदेश
## (पारित दिनांक १४.०३.२०२४)

वादीच्या वकीलांनी सदरचा अर्ज दिनांक १५.०२.२०२४ रोजी दाखल केला असून त्यांच्याविरुध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. त्यांच्या कथनानुसार, सदर प्रकरण हे वादीचे पुराव्याकरिता नेमलेले होते परंतु वादीची आईला पोटाच्या दुर्धर आजाराने अकोला व औरंगाबाद येथे भरती करावे लागल्याने पुरावा दाखल करता आला नाही. त्यामुळे वादीला पुरावा दाखल न करता आल्याने सदर प्रकरणात वादीचा पुरावा बंदचा आदेश पारित करण्यात आला असल्याने सदर पुरावा बंदचा आदेश रद्द होउन मिळण्याची विनंती केली. याउलट प्रतिवादीने सदर अर्जास सक्त विरोध दर्शवून अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केली.

**०२** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा १७.०२.२०२१ रोजी ताबा मिळण्याकरीता व अनुचित लाभ मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींनी नि.क्र.१२ खाली लेखी जवाब दाखल केला. त्यानंतर प्रकरणात नि.क्र.१३ वर दिनांक २७.०६.२०२३ रोजी मुद्दे काढण्यात आले. त्यानंतर वादींना पुरावा दाखल करण्यास संधी दिल्यानंतर नि.क्र.१५ व नि.क्र.१६ वरील अर्ज नामंजूर करण्यात आले. त्यानंतरही पुरावा न आल्याने दिनांक ११.०१.२०२४ रोजी वादीचा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर दिनांक १५.०२.२०२४ रोजी सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्याच रोजी प्रतिवादीतर्फे नि.क्र.१७ वरील अर्ज वादीचे प्रकरण खारीज करण्यासाठी दाखल करण्यात आला आहे.

**०३** दाव्यात वादींना दिलेली संधी बघता हा अर्ज नामंजूर करण्याजोगा आहे. परंतु सदर अभिलेखावर मुददे स्थापित होउन वादींचा पुरावा नाही असा आदेश पारित झालेला असला तरी वादीतर्फे या अर्जासोबत पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रकरणात वादींना नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने आणि प्रकरणाचे स्वरुप व सद्यस्थिती बघता एक संधी देणे योग्य ठरेल. जेणे करुन प्रकरणाचे गुणदोषावर निराकरण होईल. प्रतिवादींना झालेल्या त्रासाबद्दल सदरच्या अर्जाचा खर्च वादीवर लावणे समर्पक वाटते. त्यामुळे

सदर अर्ज नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज रु. ३००/- (तीनशे रुपये केवळ) खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. सदर अर्जाचा खर्च प्रतिवादींना अदा केल्यानंतर वादीतर्फे दाखल करण्यात आलेला पुरावा अभिलेखावर घेण्यात यावा.

३. दोन्ही पक्षांनी सदर प्रकरण तत्परतेने चालवावे.

स्वा/-

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १४.०३.२०२४

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | H.A.Uchade (Stenographer L.G.) |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 14.03.2024 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 14.03.2024 |
| Judgment/Order uploaded on | : | 14.03.2024 |